# कृत्रिम बुद्धिमत्तेची शिक्षणात भूमिका

**राजू दत्ता शिंदे**
*सहशिक्षक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय उमरखेड, ता. उमरखेड जि. यवतमाळ*
*rdxshinde4016@gmail.com*

**सारांश**
*कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण आता एकरूप होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत. शिक्षण प्रक्रिया आनंददायी नाविन्यपूर्ण प्रेरणादायी व अध्ययन केंद्रित बनत आहे. ज्ञानाची अमूर्त संकल्पना स्पष्ट होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे।सुकर बनले आहे.*
*महत्त्वाचे शब्द: ज्ञान प्रक्रिया, AI,Chat GPT ,VR. प्रयोग, अमूर्त संकल्पना, वेगवान प्रक्रिया, APPS*

**प्रस्तावना:**
सध्याच्या डिजिटल युगात, काँटम फिजिक्सच्या युगात ज्ञानाचा विस्तार व ज्ञान प्रक्रिया सुलभ होत आहे. पूर्वीच्या काळात असलेले संदर्भात पूर्णपणे बदललेली आहेत. अतिशय मर्यादा असलेले जग आता अधिक वेगवान होताना दिसते. ज्ञान घेण्यासाठी असणारी साधन काळाच्या ओघात अधिक वेगवान होत आहेत.
आज कुठलीही ज्ञानशाखा AI यापासून सुटलेल्या नाहीत. अगोदर तुम्ही अभ्यास करण्यासाठी विविध पुस्तके संदर्भ ग्रंथ पेपर मासिके साप्ताहिके याचा आधार घेतला जात होता .परंतु, तंत्रज्ञानात झालेली प्रगतीमुळे तुमच्या ज्ञानाची ग्रहण करण्याची क्षमता वाढली आहे.
तुम्ही सहजपणे कुठलेही ज्ञान घरबसल्या अगदी कमी वेळात कमी खर्चिकपणे मिळवू शकता .यासाठी तुम्हाला तुमच्या घेण्याची क्षमता वाढवावी लागेल. ज्ञान मिळविण्याच्या साधनात वाढ झाल्यामुळे ज्ञानाचा विस्फोट झाला आहे.
वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेण्यासाठी करावी लागणारे प्रयोग A Iमदतीने सहज सोपे झाले आहेत. गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया या सहजपणे करताना A I चा उपयोग मोठ्या प्रमाणात होत आहे. पूर्वीच्या शस्त्रक्रिया करताना अनेक रुग्ण दगावत असत. बऱ्याच अडचणी येत . परंतु A Iयामुळे सर्व संकल्पना प्रक्रिया समजण्यास सोप्या झाले आहेत.

**शिक्षण क्षेत्रात A I ची भूमिका:**
शिक्षण क्षेत्रात आज विविध अभ्यासक्रम A Iयावर आधारित आहेत. उदाहरणार्थ, शिक्षण घेताना विविध तंत्रज्ञान वापरले जात आहे. A I प्रणाली द्वारे शिक्षण सहजपणे घेता येत आहे .विद्यार्थी व शिक्षक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जवळ आले आहेत. विज्ञानातील प्रयोग विविध □पच्या माध्यमातून सहज शिकता येत आहेत. मानवी हस्तक्षेपाशिवाय प्रक्रिया क्रिया करता येतात .अध्यापन प्रक्रिया अर्थपूर्ण बनवताना AI महत्त्वाची भूमिका बजावत आहे .एक शिक्षक या माध्यमातून विविध प्रयोग करून त्याची प्रतिकृती दाखवू शकतो. भविष्यात एखादी प्रक्रिया कशी असावी याची विवरण आपण सहजपणे यामुळे समजते. भूगोल सारख्या विशेष सहजपणे शिकण्यास A Iमदत करते. विविध भूरूपे ,रचना, पर्वत, पठारे ,नद्या, समुद्र, रचना आपण A I च्या मदतीने समजून घेत घेऊन आपली ज्ञानाची पातळी वाढू शकतो.
केरळ सारख्या राज्यामध्ये A I शिक्षकांनी आता पाऊल टाकलेले आहे.
थोडक्यात, संपूर्ण क्षेत्र A I ने व्यापून टाकलेली आहेत.

**समारोप/निष्कर्ष :**
AI.. ने शिक्षण आनंददायी झाले.
ज्ञानाची प्रक्रिया सोपी व सहज झाली.
संशोधन प्रक्रिया सुलभ झाली.
A I संचार सर्व क्षेत्रात झाल्यामुळे मानवी जीवन सुकर झाले.
Chat जीपीटी मुळे आपणास हवी ती गोष्ट समजून घेण्याची प्रक्रिया सोपी झाली.
विद्यार्थ्यांचे प्रयोग समजून घेण्याची कार्य सोपे झाले.
नवीन शिक्षण धोरणात मध्ये AI भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**संदर्भ:**
टेक्निकल प्रोसेस
ए आय काल आज आणि उद्या... संपादकीय.